
# जिजाऊ कमर्शिअल को.ऑप.बँक ली., अमरावती



## वार्षिक अहवाल
### २००६-२००७

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स, वालकट कंपाऊंड, अमरावती. फोन : २५६००५७, २५७००५६, २५६६१५६.

।। हीच जिजाऊ जिने घडविले श्री शिवछत्रपती ।।



# राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँ साहेब

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् वालकट कंपाऊंड, अमरावती

फोन - २५६००५७, २५७००५६, २५६६१५६

## संचालक मंडळ (२००६-२०११)

| अ.क्र. | नांव | पद | फोन |
|---|---|---|---|
| १. | इंजि. अविनाश अंबादासराव कोठाळे<br>CHARTERED ENGINEER M.E. LL.B. ADIM. DMM. | अध्यक्ष | ✆-2571125<br>✆-2566188 |
| २. | इंजि. राजेंद्र शंकरराव जाधव<br>B.E. (Mech.) | उपाध्यक्ष | ✆-2510552<br>✆-2520508 |
| ३. | इंजि. अरविंद दत्तात्रय गावंडे<br>B.E. (Civil); DIT | संचालक | ✆-2663915 |
| ४. | इंजि. दिनकर ज्ञानरावजी भुगुल<br>D.C.R.E. | संचालक | ✆-2561177 |
| ५. | इंजि. प्रदीप चतुरसिंग वानखडे<br>B.E. (Civil) DBM | संचालक | ✆-9370157542 |
| ६. | डॉ. अनिल सुखदेवराव बोंडे<br>M.B.B.S., M.D. | संचालक | ✆-2576116 |
| ७. | श्री. एकनाथराव ज्ञानेश्वर मोहोड<br>B.Com., D.C.B.M. | संचालक | ✆-2512278 |
| ८. | श्री. भास्करराव अमृतराव चौधरी<br>M. Com. | संचालक | ✆-2670517 |
| ९. | इंजि. रानिश रामदास काळमेघ<br>B.E. (Comp.), M.B.A. | संचालक | ✆-2531000 |
| १०. | प्रा. अनिल मधुकरराव बंड<br>M.Sc. (Agri.) | संचालक | ✆-9823110300 |
| ११. | श्री. नानासाहेब रामरावजी मानकर<br>M.A. | संचालक | ✆-2577520 |
| १२. | डॉ. वसंतराव नामदेवराव लवणकर<br>M.B.B.S., M.S. (Surgery) | संचालक | ✆-9823037040 |
| १३. | डॉ. सौ. विमल गणराज अढाऊ<br>M.Sc.Ph.D. | संचालिका | ✆-2663053 |
| १४. | डॉ. सौ. प्रतिभा साहेबराव विघळे<br>M.Sc.; Ph. D | संचालिका | ✆-2663716 |
| १५. | सौ. सुजाता नामदेवराव वावरे<br>M.A. | संचालिका | ✆-2531006 |
| १६. | ॲड. रविंद्र पुंडलिकराव नायडे<br>M. Com., LLB. | संचालक | ✆-2567062 |
| १७. | श्री. चैतन्य कृष्णराव इंगळे<br>C.A. | संचालक | ✆-9422668237 |

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् वालकट कंपाऊंड, अमरावती
फोन - २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१) २५६६१५६

अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींग

क्र. जिजाऊ/आमसभा/३/२७४१/२००७
दि. २८ जुलै २००७

सन्माननीय,

भागधारक सभासद,

सस्नेह नमस्कार,

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि., अमरावती ची **वार्षिक सर्व साधारण सभा रविवार, दि. १२/८/२००७ रोजी सायंकाळी ४.३० वाजता, शहीद स्मारक सभागृह टाऊन हॉल, राजकमल चौक, अमरावती** येथे खालील विषयानुसार कामकाज चालविण्या करीता **आयोजित केलेली आहे.** तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

संचालक मंडळाचे आदेशान्वये
शंकरराव राऊत
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सभेची विषय पत्रिका :**

१. मागील आमसभा दि. १३.८.२००६ चे इतिवृत वाचून मंजूर करणे.
२. सन २००६-२००७ (३१ मार्च २००७) अखेर हिशोबाचे पत्रके, ताळेबंद, नफा तोटा पत्रक मंजूर करणे
३. सन २००६-०७ ह्या वर्षात झालेल्या नफ्याचे विनियोजनास मंजूरात देणे.
४. बँकेचे सन २००७-०८ ह्या वर्षाचे अंदाज पत्रक मंजूर करणे. २००६, २००७ चे प्रत्यक्ष खर्चास मंजूरात देणे.
५. बँकेचे पोटनियम दुरूस्ती प्रस्तावास मान्यता देणे.
६. बँकेची बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
७. बँकेचे अंतर्गत तपासणी करीता ऑडीटरची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. संचालक मंडळ व त्याचे नातेवाईकाकडील कर्ज प्रकरणाची नोंद घेणे.
९. २००६-२००७ चे ऑडीट नोट अवलोकन करणे.
१०. मा. अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

---

टिप -
१. गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा लगेच १ तासा नंतर त्याच दिवशी त्याच विषयावर त्याच ठिकाणी घेण्यात येईल त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. बँकेचे कामकाजा विषयी कोणाला प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरूपात सभेपूर्वी ३ दिवस अगोदर पाठवावे व पोच घ्यावी.
३. बँकेच्या भागधारकांनी बचत खाते उघडून लाभांश धनादेश बचत खात्यामध्ये जमा करावेत,हि विनंती
४. ज्या भागधारकांनी भागपत्रके नेलेली नसतील त्यांनी बँकेच्या मुख्यकार्यालयातून न्यावेत तसेच वारसाची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी करावी.

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् वालकट कंपाऊंड, अमरावती

फोन - २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१)२५६६१५६


आदरणीय सभासद,

सहकार बंधु व भगिनिंनो,

जय जिजाऊ !

अमरावती

२८ जुलै २००७

आषाढ शुक्ल १३, शिवशके ३३४

आपल्या जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेचा सन २००६-२००७ या ७ वा वार्षिक अहवाल आपणास सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. आपल्या जिजाऊ बँकेला सहकार क्षेत्रात मिळालेले यश निश्चितपणे स्पृहणीय असुन हिच यशो शिखराची पाऊलवाट आहे. अर्थात बँकेवर आपण दर्शविलेला अढळ विश्वास व सहकार्याचा प्रतीमध्ये निहाळा घडा आहे.

सुराज्य व स्वातंत्र्याचा अविष्कार मनामनात निर्माण करणाऱ्या व राष्ट्रप्रेमाचे धडे देणाऱ्या राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊंच्या ऐतिहासिक वारसा, आपल्या सर्वांना एकसंघ राष्ट्र व समाज हितासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो. या राष्ट्रीय प्रेरणेतुनच महाराष्ट्रात माँ जिजाऊ ने पेरलेले बिज, छत्रपती शिवरायांनी स्वराज्य आणि सुराज्याने फुलविले तर दिल्लीचे तक्त हादरून सोडणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाने शतकोत्तर राष्ट्रभक्तीची प्रेरणा देत राहिले, हाच तर खरा सहकार ! या जाणिवेतूनच महाराष्ट्राची कन्या राष्ट्रपतीपदावर आरूढ झाली हिच यशोगाथा आहे. महाराष्ट्राच्या एकात्मतेची आणि सहकाराची ! जिजाऊ बँके प्रती आपल्या सर्वांचे सहकार्य दिवसेंदिवस वार्षिक अहवालाच्या कार्यसिद्धीवरून दृष्टिक्षेपात होईल हा मला विश्वास आहे.

सन २००६-२०११ पर्यंत संचालक मंडळाची मार्च २००६ ला बँकेची अविरोध निवडणूक सहकार क्षेत्रात सामाजिक एकतेचे निर्लेप दर्शन व नावलौकीक वाढविणारी ठरली.


तद्वतच विजया दशमीच्या शुभपर्वावर ऑक्टोबर २००० ला सुरू झालेल्या आपल्या बँकेला यशोशिखरे पादाक्रांत करीत सातत्याने सन २००६-२००७ चा आढावा घेतल्यास अर्थसंपन्न समाजनिर्मितीमध्ये अग्रेसर राहिल हा विश्वास आहे. बँकेच्या सहाव्या आमसभेमध्ये आपले सर्वांचे मनःपूर्वक स्वागत.

सुस्वागतम्-स्वागतम्-सुस्वागतम् !

## -: बँकेची प्रगती भागभांडवल व निधी :-


◉ भागभांडवल :


२००६-२००७ या आर्थिक वर्षामध्ये १३०.०३ लक्ष भागभांडवल झालेले असुन मागील वर्षाच्या तुलनेत १५.६० टक्के वाढ झालेली आहे. सभासद संख्या २०१९ वरून २९२८ पर्यंत अहवाल वर्षात झाली. २१ व्या शतकातील नेटवर्किंगच्या जगामध्ये सहकाराच्या जिजाऊ अर्थरथाची चक्रे गतीशील होण्यासाठी शाखा विस्तारकरीता प्रवेश बिंदु मानदंडाची अट २ कोटी भागभांडवल किमान असल्याने आपण १:२ या गुणोत्तराने किमान रू. ५०००/- प्रत्येकी भागधारक करण्याचा निश्चय २००७-२००८ मध्ये करण्यासाठी कृतसंकल्प करू.



- **निधी :**

राखीव व इतर निधी मध्ये इमारत निधी, लाभांश समिकरण निधी, बुडीत व संशयित निधी तरतूद, घसारा निधी, गुंतवणूक व जोखिम निधीचा समावेश असून अहवाल वर्ष २००६-२००७ या मध्ये रु. २६४.८८ लक्ष आहे. सदर निधीमध्ये रु. ४६.५२ लक्ष वाढ आहे. अहवाल वर्षात बँकेचे भांडवल पर्याप्तता ओकेक्षणानुसार १६.८२ टक्के आहे. सदर भांडवल पर्याप्तता मध्ये बँकेच्या सुरक्षितेकरिता भागभांडवल व इतर निधींची वाढ होणे बँकेच्या सुरक्षितेकरिता आवश्यक आहे.




- **ठेवी :**

सन २००६ मध्ये रु. २५६१.१४ लक्ष ठेवी होत्या त्यामध्ये ५३९.७९ लक्ष वाढ होवून अहवाल वर्षात एकुण रु. ३१००.९३ लक्ष ठेवी आहेत. ठेवीमध्ये २१.०७ टक्के वाढ ठेवीदाराचा बँकेवर असलेल्या विश्वासाहतेचे प्रतीक आहे.

**जिजाऊ बँकेची प्रगती व सांपत्तीक स्थिती खालील तक्त्यावरून अधिक स्पष्ट होईल.**

(आकडे लाखात)


| वर्ष | सभासद | भागभांडवल लक्ष रु. | राखीव व इतर निधी लक्ष रु. | ठेवी लक्ष रु. | कर्ज | गुंतवणूक | खेळते भांडवल | निव्वळ नफा | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९८-९९ | १५३५ | २१.५२ | ०.४० | -- | -- | -- | -- | ०.५६ | [illegible] |
| १९९९-०० | १५७६ | २४.९६ | ०.४५ | -- | -- | -- | -- | ०.०५ | [illegible] |
| २०००-०१ | १८८१ | ३१.८८ | २.४८ | ३६२.५८ | २०३.८४ | ६६ | ३०५.३० | १०.०३ | [illegible] |
| २००१-०२ | १९८० | ४०.७९ | ६.७० | ८७५.०८ | ६००.४५ | १५३ | ९११.८६ | १०.०३ | |
| २००२-०३ | २२१० | ६०.७० | २३.५८ | १०५३.८९ | ७९९.१० | २५५.६२ | १२७८.८५ | १२.३४ | ° [illegible] |
| २००३-०४ | २३०३ | ७९.६४ | ५२.५५ | १४८३.३६ | १००३.५० | ४४४.८० | १६५०.५२ | ४०.३५° | |
| २००४-०५ | २४८६ | १०२.७६ | ११६.७० | १६८३.४८ | १३०१.३१ | ४८१.६६ | २०५५.६१ | ३०.०० | |
| २००५-०६ | २५२६ | ११९.५५ | २१८.०६ | २५६१.१४ | १६६६.०४ | १२६१.१४ | ३-६३.४३ | २६.५० | |
| २००६-०७ | २६२८ | १४७.०३ | २६४.८८ | ३१००.९३ | २०६२.७९ | १४५५.८८ | ४०१५.६३ | ४३.४२ | [illegible] |

● **कर्जव्यवहार :**

बँकेने अहवाल वर्षापर्यंत एकूण रुपये २१६२.७९ लक्ष कर्जवाटप एकूण ९८५ सभासदांना केले आहे त्यामध्ये अहवाल वर्षात एकूण ४८६ .२१ लक्ष कर्ज वाटप केले. मागील वर्षाच्या तुलनेत कर्जवाटपात सरासरी ३२.०४ टक्के वाढ झालेली आहे.

अहवाल वर्षात बँकेने रिझर्व बँकेच्या मापदंडानुसार अग्रक्रम क्षेत्रास रु. १४१३.१६ लक्ष म्हणजे ६५.४० टक्के कर्ज वाटप करून निर्धारीत ६० टक्के मापदंड साध्य केले आहे. तर दुर्बल घटकास रु २३३.५८ लक्ष कर्ज वाटप केले. सदर कर्ज १६.०८ टक्के असून निर्धारीत २५ टक्के होण्याकरीता भविष्यात याकडे प्रकर्षाने लक्ष केंद्रीत करण्याचा मानस आहे.

दुर्बल घटकाची मागणी नसल्यास तसेच परतफेड नसल्यास कर्ज उद्दिष्ट साध्य करणे प्रश्न आहे. नियमित कर्ज परतफेड व चांगल्या कर्ज धारकांकरिता बँकेने १% टक्के व्याज कमी करणे तथा व्याजदर निगोशिएबल ठेवण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेतला आहे. चांगल्या ग्राहकाची कर्ज मागणी वाढावी हा यामागचा उद्देश आहे.




बँक सभासदांना, शिक्षण, घर खरेदी, प्लॉट खरेदी, शेती खरेदी, बांधकाम, व्यापार उद्योग विकास, आजारपण, वाहन खरेदी, मशिनरी खरेदी इत्यादी कारणाकरीता कर्ज उपलब्ध करुन देते. नविन कार खरेदी करीता **१० वर्ष मुदती करीता दिर्घमुदती परतफेडीचे योजना विविध सेवेत काम करणाऱ्या व्यक्तिंसाठी केवळ आपल्याच बँकेमध्ये आहे.** बँक सहलीकरीता कर्ज देणार आहे. तसेच शेतकऱ्यांना घर बांधणे शेती विकास करणे व लग्नाकरिता कर्ज देऊन विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता बँकेने प्रयत्न केला आहे.

**बँकेने कर्जप्रकारनिहाय वाटप केलेल्या कर्जाचा वार्षिक गोषवारा**

(लाखात)

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | ००-०१ | ०१-०२ | ०२-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ | ०६-०७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॅश क्रेडीट | ६३.२६ | २९९.१२ | ३१२.१८ | ४५४.८३ | ६६८.६१ | ७६८.७१ | ९९९.०० |
| २ | गृह तारण | ५४.३० | १८३.९३ | २३४.५३ | २२०.३५ | २२४.२२ | २७१.८८ | ४०८.०१ |
| ३ | वैयक्तिक तारण | २७.२० | ९२.३५ | ११४.०४ | १५३.३५ | २५४.१५ | ३२९.२८ | ३७७.०७ |
| ४ | हायपोथिकेशन | ३३.२० | ४०.३६ | ४८.०० | ३७.१२ | ३६.२९ | १२२.६१ | १६६.०१ |
| ५ | वाहन कर्ज | १५.९८ | ३१.३८ | ५४.२४ | ४८.२९ | ५६.२३ | ९१.०१ | १२२.६१ |
| ६ | वैधानिक | ०३.४८ | ९३.८३ | १५.८५ | ९२.३२ | ३.५१ | ८.८२ | ५.१० |
| ७ | मुदतीठेव तारण | ०१.७० | ४३.१३ | २४.६२ | २६.२४ | ४३.०६ | १०६.८२ | ७७.४८ |
| ८ | शासकीय सेक्युरिटी | ०.१७ | ०२.०० | ०४.१७ | ०७.४६ | ९.१२ | १२.६३ | ६६.०३ |
| ९ | बिल डिस्कॉऊंटींग | -- | ००.५४ | -- | ३१.०८ | १.४४ | -- | ०.३२ |
| १०. | इतर स्टाफ कर्ज | ००.०५ | ००.०१ | ००.०३ | ००.०६ | ०.९० | ०.९३ | ०.५५ |
| ११. | शेती कर्ज | -- | -- | -- | -- | -- | -- | ९९.२० |
| | एकूण | २०३.३४ | ५००.४१ | ६९९.१० | १००९.५० | १३०२.०५ | १६३५.०४ | २१६२.७९ |
| | कर्ज वाढीचे प्रमाण% | -- | १४५% | ३९.०८% | २६.२२% | २८.९७% | २८.५५% | ३२.०४% |

**◉ <u>कर्जवितरण व एन.पी.ए. तरतुद :</u>**

बँकेने २००६-२००७ पर्यंत रू. १५३४.०४ लक्ष कर्ज वितरीत केले होते तर अहवाल वर्षात एकुण रू.२१९.२.७९ लक्ष कर्ज वाटप असुन २९.०४ टक्के वाढ कर्ज वाटपात आहे. अहवाल वर्षात रू. १३४.७३ लक्ष कर्जावरील व्याजातून मिळाले.

बँकेने अहवाल वर्षात रिझर्व बँकेच्या अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) मापदंडानुसार एकुण रू.१०३.९० लक्ष रूपये एन.पी.ए. कर्ज ठरविलेले असुन नक्त अनुत्पादक कर्ज ५.४९ टक्के आहे. बँकेने नफ्यातुन एन.पी.ए. तरतुद रू. २२.३२ (लाख) केलेली आहे. बँकेजवळ रू. १८०.९३ लक्ष वाईट व संशयित बुडीत कर्जासाठी अतिरिक्त जमा आहेत. सदर तरतुदीमुळे **बँकेचे नक्त अनुत्पादक कर्ज बँकेने ३.१३ टक्के दर्शविलेले होते. ते अंकेक्षनानंतर ५.४९ टक्के आहे. अहवाल वर्षात ३.४८ टक्के एन.पी.ए. मध्ये घट झाली आहे.**

रिझर्व बँकेने पुर्वीचे एन.पी.ए. चे १८० दिवसाचे मानदंड २००७-२००८ करिता ९० दिवस केलेले आहे. तीन महिन्यात किस्त किंवा व्याज न आल्यास खाते अनुत्पादक वर्गवारीत जाते. कर्जदारांमध्ये <u>**"आर्थिक शिस्त"**</u> लावणे हा हेतू आर.बी.आय. चा आहे.

**बँकेचे नक्त अनुत्पादक कर्ज (एनपीए) किमान ३ टक्केपेक्षा कमी असणे चांगल्या बँकेचे लक्षण आहे. परंतु संचालक मंडळाने आपला बँकेचा शुन्य टक्के एन.पी.ए. हा संकल्प केला आहे.**

**◉ <u>एन.पी.ए. कमी करण्याकरीता उपाय :</u>**

अमरावती जिल्ह्याचा आर्थिक विकास कृषी उत्पन्नाशी निगडीत असल्याने व शेतकरी आत्महत्या संदर्भात पंतप्रधान पॅकेज अंतर्गत असल्याने एन.पी.ए. चे १८० दिवस आगामी २ वर्ष राहणे आवश्यक आहे.

आपल्या बँकेचे एनपीएचे प्रमाण कमी करण्याकरीता बँकेचे कर्जदार ह्यांनी त्यांच्या अडचणींची बँकेला कल्पना द्यावी व तत्परतेने खाते सुरळीत करण्याकरीता तात्काळ कार्यवाही करावी, ही विनंती. कर्ज खात्यामध्ये मुद्दल व व्याज नियमितपणे भरलेले असावे.

बँकेचे कॅश क्रेडीट सुविधा उपभोगणारे कर्जदार, सभासद त्यांच्या व्यवसायाच्या मागणीनुसार उचल करतात परंतु कधी कधी रक्कम कमी असतांना त्यांचे खात्याअंतर्गत जास्त मागणी (ओव्हर ड्राफ्ट) करतात. तसेच परस्पर बँकेची मंजुरी न घेता धनादेश देतात व धनादेश परत केल्यानंतर बँक सहकार्य करीत नाही असे ओरड करतात. कोणत्याही प्रकारचे मंजूर कर्जापेक्षा जास्त उचल देण्यास रिझर्व बँकेने निर्बंध लावलेले असल्याने सभासदांनी अशा प्रकारे ओव्हर ड्राफ्ट न घेता स्वतःमध्ये आर्थिक शिस्त आणावी व नियमानुसार खाते व्यवहारानुसार बँकेच्या संचालक मंडळाकडे अतिरीक्त मागणी नोंदवून मर्यादा वाढविण्याकरीता अर्ज करणे अपेक्षित आहे.

**◉ <u>संचालकाकडील कर्ज</u> :**

रिझर्व बँकेच्या दिशा निर्देशनानुसार बँकेने अहवाल वर्षात कोणतेही नविन कर्ज संचालक अथवा त्यांच्या नातेवाईकांना मंजुर केलेले नाही. पुर्वी दिलेल्या कर्जाची नियमितपणे वसुली सुरू असुन त्यांच्या खात्यात देय असलेले सर्व कर्ज निरंक होतील. सद्यस्थितीत दिनांक ३१ मार्च २००७ च्या ताळेबंदावर संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांकडील कर्जाची रक्कम केवळ ६.४८ लक्ष असुन एकुण कर्जाशी त्याचे प्रमाण फक्त ० ३०% आहे.

**● ठेवीदारांची सुरक्षितता :**

ठेवीच्या सुरक्षाकरीता रिझर्व बँकेचे अंगिकृत ठेव विमा आणि जमा गॅरंटी महामंडळाकडे (DICGC) नियमानुसार बँक सर्व ठेवीवर विमा प्रिमियम अर्धवार्षिक जमा करते. अहवाल वर्षात एकूण रु. ३०.६४ लक्ष ठेवींवर प्रिमीयम दिला. यापुढे ठेवीदारचे प्रत्येकी एक लक्ष रुपये महामंडळाकडून सुरक्षित करण्यात आले आहे.

**● बँकामधील गुंतवणुक :**

अहवाल वर्षात विविध बँकामध्ये जिजाऊ बँकेची एकूण रु. १०१३.१८ लक्ष गुंतवणुक आहे. रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार १०% सहकारी बँकामध्ये व १५% शासकीय प्रतिभुतिमध्ये गुंतवणुक करण्याबाबत निर्देश आहेत. बँकामधील सर्व ठेवी सुरक्षित आहेत त्यावर बँकेला सरासरी ८.०० टक्के व्याज मिळते सुनियोजित गुंतवणुक करण्यावर संचालक मंडळाच्या मासिक सभामध्ये कटाक्षाने विशेष आग्रह असतो. परंतु शासकिय प्रतीभुती मधील गुंतवणूक सरासरी ६.०० टक्के व्याजदरामध्ये आर.बी.आय.च्या निर्देशाने केलेली असून त्यावर अत्यल्प व्याज मिळत असल्याने नुकसान होत आहे. केंद्र सरकार व वित्त मंत्रालयाने आर.बी. आय. च्या सहमतीने प्रतीभुतीच्या खरेदी किमतीवर प्रीमचुअर वन टाईम वंधाडावल दिल्यास सर्व सहकारी बँकांना याचा फायदा होईल.

**● शासकीय प्रतिभुतीमधील गुंतवणुक :**

बँकेने एकूण रुपये ४८१.३० लक्ष गुंतवणूक शासकीय प्रतिभुती मध्ये मुदत व मागणी देयता रिझर्व बँकेने निर्देशीत केल्यानुसार केली. शासकीय रोख्यांचे दर्शनी किंमतीमध्ये घट झालेली आहे. बँकेकडे असलेल्या शासकीय रोख्यांचे विवरण खालील प्रमाणे आहे. (आकडे लाखात)

| Sr. No. | Held to Maturity (HTM) | Held for Trading(HFT) | Held to Sale (HFS) |
|---|---|---|---|
| 1. | 5.69 GOI 2018 Rs. 35.60 | Nil | 7.46 GOI 2017 Rs.50.00 |
| 2. | 6.01 GOI 2028 Rs. 80.70 | | |
| 3. | 6.13 GOI 2028 Rs. 75.00 | | |
| 4. | 6.17 GOI 2023 Rs. 90.00 | | |
| 5. | 6.25 GOI 2018 Rs. 150.00 | | |
| | TOTAL Rs. 431.30 | Nil | TOTAL Rs. 50.00 |

शासकीय प्रतिभुतीचे दर्शनी मुल्य दिनांक ३१.०३.२००७ ला वरील सेक्युरीटी करीता अनुक्रमे १) ८१.००, २) ७६.७०, ३) ७८.९०, ४) ८२,००, ५) ८७.००, ६) ९६.५० असे आहेत. स्टॅटीस्ट वर्गवारीमध्ये ठेवलेल्या रोख्यांवर व्याज मिळत आहे. परंतु आज विक्री केल्यास तोटा आहे. तरीच सदर गुंतवणुकीमध्ये असलेल्या जोखमीकरीता रुपये ४,४२,०००/- तरतुद Amortisation अंतर्गत केलेली आहे.

**● ठेवीवरील देणे व्याज :**

ठेवीदाराचे देणे देय दिनांकाला मिळणेकरता अहवाल वर्षात व्याजाची तरतुद रु.१८८.४९ लक्ष केली आहे. ठेवीवर बँक ७.५% ते ९.५% पर्यंत मुदतीनुसार व्याज ग्राहकांना देते. जेष्ठ नागरिकांना १०% ते १०.५% टक्के व्याज देते. इतर राष्ट्रीयकृत बँकापेक्षा १% जास्त व सहकारी बँकापेक्षा ०.५% जास्त व्याज दर ठेवीदारांना देण्यात येते. ठेवीदाराचे नुकसान होऊ नये हा व्याज जास्त देण्यामागचा उद्देश आहे.

**● रोखनिधी व तरती जिंदगी :**

सहकारी बँकांनी रिझर्व बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ मधील कलम १८ व २४ नुसार रोख निधी (CRR) व तरती जिंदगी (SLR) राखणे अनिवार्य असल्याने बँकेने वेळोवेळी रिझर्व बँकेच्या नियमानुसार राखली आहे.

## • कर्जवसुली :

अहवाल वर्ष २००६-२००७ मध्ये एकूण रू. ३५२.४० लक्ष बँकिने कर्ज वसुल केलेले आहे. अहवाल वर्षात काही महत्वाच्या कर्जप्रकार निहाय वसुलीचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

| अ.क्र. | कर्जप्रकार | कर्जरक्कम | कर्जमागणी | कर्जरक्कम वसुल |
|---|---|---|---|---|
| १. अ | सेक्युअर्ड पर्सनल कर्ज | ३५०.०० | १८७.०९ | १४८.०० |
| २. | हाऊसिंग मॉर्टगेज कर्ज | ४०८.०२ | १८५.५९ | १५२.०७ |
| ३. | हायपोथिकेशन कर्ज | १६९.०४ | ३५.४० | २२.२१ |
| ४. ब | वैयक्तिक लोन कर्ज | ५.१९ | ५.०९ | ४.३६ |
| ५. | वाहन कर्ज | १२२.६१ | ४५.६१ | ३४.३१ |
| | एकूण | १०७५.८३ | ४६१.४८ | ३५२.४० |

नियमितपणे कर्जपरतफेड करणारा सभासद बँकेचा हितचिंतक असुन बँकेला अशा कर्जधारकाकडून फायदा होतो. जे कर्जदार नियमित कर्जाची परतफेड करित नाही त्यांच्यामुळे बँकेला व्याज मिळत नाही. उलट मिळालेल्या उत्पन्नातुन अनुत्पादक कर्जाकरीता तरतुदी कराव्या लागतात. अहवाल वर्षात एकुण अनुत्पादक कर्ज रक्कम रूपये ३७३.७५ लक्ष आहे. रिझर्व बँकेने विवेकपूर्ण मापदंड लागू केलेले असुन अनुत्पादक कर्जाकरीता ९० दिवस कर्ज खात्यात व्याज व मुद्दल हप्ता न भरल्या गेल्यास कर्जखाते अनुत्पादक घोषित करण्याचे सुचित केले. बँकेचे नक्त अनुत्पादक कर्ज अहवाल वर्षात रू. ५.४६ टक्के आहे. शुन्य टक्के एन.पी.ए. असणे. ही संकल्पना अंमलात आणण्याकरीता सर्व कर्जदार सभासदांनी स्वत:मध्ये आर्थिक शिस्त आणणे अपरिहार्य असून थकित कर्ज तात्काळ भरणे अपेक्षित आहे. थकित कर्जदारांनी दंडीत व्याज आकारल्याने येत असल्याने नुकसान त्यांचेच आहे व शेवटी बँक तारणातील अथवा घरातील कोणतीही वस्तु विकु शकत असल्याने अशी वेळच येणार नाही याकरीता थकित कर्जधारकांनी कर्ज नियमित करण्याकरिता कटीबद्ध रहावे. थकीत कर्जधारकांनी तात्काळ थकीत कर्जाचा भरणा करून आपले खाते नियमित करावे असे संचालक मंडळाच्यावतीने आवाहन करतो.

## • थकित कर्जधारकांसाठी विशेष सुचना :

निगोशियबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १३८ अंतर्गत बँकेच्या कर्जधारकास कर्ज परतफेडीचा धनादेश न वटल्याने दोन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा अमरावती येथील न्यायालयाने दिलेली आहे. कोणत्याही कर्जधारकास शिक्षा व्हावी हा उद्देश नाही. परंतु कर्ज नियमित, प्रामाणिकपणे भरणे ही रास्त अपेक्षा आहे. थकित कर्जदारांच्या मालमत्तेचा लिलाव करणे त्यांचे घरी "धडक वसुली पथक" वारंवार येणे ह्या बाबी बँकेला सुद्धा नको असतात. लोकांची रक्कम विश्वासाने कर्ज म्हणुन बँकेने सर्व सामान्य लोकांच्या ठेवींमधून दिलेली असल्याने सामाजिक भान म्हणुन परतफेड करणे ही कर्तव्यदक्ष, प्रामाणिक कर्जधारक नागरीकांची जबाबदारी आहे.

अहवाल वर्षात बँकेला एकुण २४ कर्ज प्रकरणात वसुलीचे प्रमाणपत्र मिळालेले असुन १४ प्रकरण सहकार खात्याकडे दाखल केलेले आहे. सेक्युरीटेझेशन कायद्या अंतर्गत २६ कर्जधारकांना नोटीस बजावल्या असुन कार्यवाही सुरू आहे. तसेच सविस्तर कर्ज प्रकार निहाय एन.पी.ए. मधील २०९ प्रकरणाचा गोषवारा अहवालात स्वतंत्रपणे दिलेला आहे.

### ❋ नफा व विनियोग :

अहवाल वर्षामध्ये बँकेला एकुण उत्पन्न रु.२९३.७० लक्ष मिळाले. त्यामध्ये प्रामुख्याने कर्जाचे व्याजातुन रु. १३४.५८ लक्ष, बँकींग व्यवहार रु. ४.६६ लक्ष इतर रु. ११४.२६ लक्ष उत्पन्न मिळालेले आहे. एकुण उत्पन्नातुन सर्व व्याज, इतर [illegible] व तरतुदी नंतर अनुत्पादक कर्जाकरिता रु. २३.३२ लक्ष, इतर बाबींकरीता रु. ९.३५ लक्ष तरतुद गृहीत धरता बँकेला निव्वळ नफा रु.१३.८२ लक्ष आहे.


| |
|---|
| अहवाल वर्षात सर्व नियमानुसार तरतुदी करुन संचालक मंडळ ८ टक्के लाभांश देण्याचे प्रस्तावित करीत आहे. |

नफ्याचे विनियोजन खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.


| | | | |
|---|---|---|---|
| सन २००६ – २००७ या एकुण | | | |
| शुद्ध निव्वळ नफा (ताळेबंदाप्रमाणे) | | रु. | १३८२२७६.८० |
| नफ्याचे विनियोग | | | |
| ❋ राखीव निधी एकुण नफ्याच्या २५% (कायद्या प्रमाणे) | | रु. | ३४५५६९.०० |
| ❋ लाभांश ८% (सन २००६ चे भागभांडवलावर ) | | रु. | ९५५९१८.०० |
| | एकुण | रु. | १३०१४८७.०० |
| उर्वरित नफा | शिल्लक एकुण | रु. | ८०७८९.८० |
| शिल्लक नफ्यामधून तरतुदी | | | |
| लाभांश समकरण निधी (शिल्लक रकमेच्या २५%) | | रु. | २०१९७.०० |
| बुडीत व संशयित कर्ज निधी (शिल्लक रकमेच्या १५%) | | रु. | १२११८.०० |
| कल्याण निधी (शिल्लक रकमेच्या १०%) | | रु. | ८०८०.०० |
| इमारत निधी (शिल्लक रकमेच्या ५०%) | | रु. | ४०३९४.८० |
| एकुण | | रु. | ८०७८९.८० |
| शिल्लक नफा | | रु. | निरंक |

### ❋ उत्पन्न व खर्च आलेख ❋

उत्पन्न




खर्च



उत्पन्न व खर्च दर्शक आलेखावरुन बँकेला महत्वाचे उत्पन्न हे कर्जातील व्याजातुन मिळते हे स्पष्ट होते तर खर्चामध्ये ठेवींवरील व्याज व तरतुदींचा मोठा वाटा आहे. भविष्यात इतर उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे लक्ष आहे.

## नविन उपक्रम :

### १) भागधारकांना विमा संरक्षण :

बँकेने सर्व भागधारकांचे विमा संरक्षण केले आहे. सदर योजनेअंतर्गत रू. १० हजार पर्यंत भागधारकांना कोणत्याही प्रकारे नैसर्गिक, अपघाती मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबीयांना प्रदान करण्यात येईल. या योजनेचा फायदा बँकेचे सभासदत्व व खाते असणाऱ्या ग्राहकांना दिनांक ३ मार्च ०७ पासून मिळणार आहे. सभासदांनी बँकेत सदर खाते उघडल्यास वारसाची नोंद, व विम्यामध्ये आपल्या वारसाची नोंद करणे अनिवार्य आहे.

### २) जिजाऊ स्मृती बुद्धीबळ स्पर्धा :

सन २००४ पासून बँक, राष्ट्रमाता राजमाता मां जिजाऊ यांच्या स्मृती दिना निमित्त "जिजाऊ स्मृती बुद्धीबळ स्पर्धा" आयोजन करीत आहे. आंतर राष्ट्रीय ख्यातीचे बुद्धीबळ खेळाडू अमरावती शहरात निर्माण होऊन बुद्धीबळ खेळाचा प्रसार व्हावा हा स्पर्धा आयोजनाचा उद्देश आहे. अहवाल वर्षात बँकेने दि. २१ जुन २००६ ते ४ जुलै २००६ या कालावधीत बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर स्पर्धेचे उद्घाटन मा. श्री. पद्माकर सोमवंशी, अधिष्ठाता डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज, अमरावती यांचे शुभहस्ते करण्यात येवून स्पर्धेचा सांगता समारोह मराठा सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष श्री. दिलीपराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. प्रफुल्ल कडू व अमरावती महानगर पालिका स्थायी समिती अध्यक्ष मंगेश उर्फ पप्पू पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. स्पर्धेमध्ये एकूण ९० खेळाडूंनी भाग घेतला होता. दरवर्षी ही स्पर्धा दि. १७ जून राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ स्मृती दिनापासून आयोजित करण्यात येते.

## बँकींग कार्यशाळा :

महिलांमध्ये बँकींग व्यवहाराची माहिती व्हावी, त्यांना बँकींग व्यवहार विनाप्रयास करता यावे म्हणून बँकेने महिलांकरीता बँकींग कार्यशाळेचे आयोजन केले. सदर कार्यक्रमात [illegible] सर्व महिलांना बँकींग व्यवहाराची विस्तृत माहिती देण्यात आली. सदर कार्यशाळेला जिजाऊ ब्रिगेडच्या सौ. मधुराताई देशमुख, जिल्हाध्यक्षा कीर्तीमाला चौधरी ह्या अतिथी म्हणून हजर होत्या.

## ऋणनिर्देश व आभार :

बँकेच्या प्रगतीमध्ये, यशामध्ये जिजाऊ बँकेचे सन्माननीय भागधारक, बँकेचे ठेवीदार, खातेदार, व्यापारी, उद्योजक, बँकेच्या ठेवी गोळा करणारे दैनिक अभिकर्ता, कर्मचारी वर्ग, कर्जाची नियमित परतफेड करणारे कर्जदार सभासद, [illegible] व सदैव बँकेसोबत असणारे हितचिंतक यांचा बहुमोल वाटा असुन त्यांचे ऋणनिर्देश करणे कर्तव्य समजतो. बँकेच्या मागणी पत्रानुसार वसुली पाठविणारे सर्व कार्यालयांचे [illegible] प्रामुख्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे, जलसंपदा, जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, इत्यादी कार्यालयातील प्रमुख व वसुली निर्गमित करणाऱ्या सर्वांचे सहकार्याबद्दल आभार. कंत्राटदारांची देयके बँकेच्या नावे काढुन जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता [illegible], श्री. ए. एन. [illegible] आणि सा. बां. [illegible] श्री. विवेक [illegible] कार्यकारी अभियंता तसेच सर्व विभाग प्रमुखांनी केलेले सहकार्य मोलाचे आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे यु.बी.डी. नागपूरचे महाप्रबंधक आनंदप्रकाश साहेब, श्री. शिशिर साहेब, सुषमा भार्गव मॅडम, विनीता मॅडम, तसेच आर. बी. आय. चे द्वितीय अंकेक्षण करणारे श्री. डी. सी. रे साहेब यांचे

● <u>लाभांश :</u>

अहवाल वर्षात बँकेला रु. १३.८२ लक्ष नफा झाला असून बँकेचे ३१ मार्च २००६ चे भागभांडवल रु. ११२.४९ लक्ष रुपयावर **बँकेच्या भागधारकांना ८% लाभांश प्रस्तावीत** केला आहे. बँकेने केलेल्या तरतुदी व नवा मिळकेगाना सहकारी बँकांना प्राप्तीकर केंद्र सरकारच्या अर्थ संकल्पातील तरतुदीनुसार आयकर विभागाने आयकर भरणे क्रमप्राप्त केले आहे. या सर्व बाबींमुळे नफा कमी झाला. सन २००५-२००६ मध्ये बँकेने सभासदांना त्यांचे मार्च २००५ चे भागभांडवलावर १० टक्के लाभांश वितरीत केला आहे. सर्व सभासदांनी लाभांश करीता बँकेत बचत खाते उघडावे ही विनंती.

बँक सहकाराने नफ्यात आहे हे प्रगतीचे लक्षण आहे आर. बी. आय. चे निकषाप्रमाणे ज्या बँका आर. बी. आय. ऑडीट ग्रेड २ मध्ये आहेत त्यांना आर. बी. आय. च्या अनुमतीशिवाय लाभांश वाटप करता येत नाही. तेव्हा सदर लाभांश आर.बी.आय.च्या अनुमतीनंतर प्रदान करण्यात येईल.

● <u>**संचालक मंडळ सभा व विविध समिती सभा :**</u>

जानेवारी २००६ ला निवडणुकीनंतर अहवाल वर्षात नविन २००६-२०११ च्या संचालक मंडळामध्ये ५ अभियंते, २ डॉक्टर, ३ प्राध्यापक, २ बँक तज्ञ, १ ॲडव्होकेट, २ समाज सेवक व १ चार्टर्ड अकौंटंट असून महिलांना उचित प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.

संचालक मंडळाच्या नियमित सभा होत असून, अहवाल वर्षात एकूण ११ सभांमधुन बँकेच्या हिताचे विविध निर्णय घेण्यात आले. संचालक मंडळाचे व बँकेचे कामकाज सुलभ होण्याकरीता विविध समित्यांच्या सभांमध्ये कर्ज समिती १९ सभा, अंकेक्षण समिती २ सभा, स्टाफ समिती २ सभा, संगणक समिती ७ सभा घेण्यात आल्यात. **समित्यांचे कामकाज कोणताही स्वतंत्र मेहनताना भत्ते न घेता सुचारु पद्धतीने सुरू आहे.** सर्व समित्यांचे विविध निर्णयाकरीता उपयुक्त मार्गदर्शन लाभले.

संचालक मंडळातील प्रत्येक विषय समितीच्या सर्वच संचालकांनी अथवा तज्ञांनी विनामूल्य बँकहित आणि **समाजहित लक्षात घेऊन मराठा सेवा संघाने समाजामध्ये रूढ केलेल्या "Pay Back to Society" ह्या ब्रिदाप्रमाणे निःस्वार्थपणे काम केलेले आहे. माझ्या सर्व संचालक सहकार्यांचे व समिती सदस्यांचे आभार.**

● <u>**लेखा परिक्षण :**</u>

सन २००६-२००७ या अहवाल वर्षाचे लेखापरीक्षण निबंधक तथा आयुक्त, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी चार्टर्ड अकाऊंटंट मेसर्स बी. एस. बाहेती अॅन्ड कंपनी या फिर्म यांच्या कडे सुपुर्द केले. त्यानुसार चार्टर्ड अकाऊंटंट **श्री बाहेती साहेब यांनी सन २००६-०७ चे बँकेचे अंकेक्षण केले असून कॅमल रेटींग नुसार "अ" ऑडीट वर्ग प्रदान केला आहे.** मा. विशेष लेखापरीक्षक श्री. चौधरी साहेब यांनी २००५-२००६ चे वैधानिक अंकेक्षण केले व बँकेने त्रुटी पुर्तता अहवाल १८ डिसें. २००६ ला सादर केला. रिझर्व बँकेचा मार्च २००६ पर्यंतचा तपासणी अहवाल दि. २५ ऑगस्ट २००६ ला बँकेस पाठविण्यात आला. मा. बी. सी. रे साहेब यांनी बँकेची तपासणी केली. बँकेने अनुपालन अहवाल विहित कालावधीत सादर केलेला आहे. रिझर्व बँकेचे रे साहेब, लेखापरिक्षक चौधरी साहेब चार्टर्ड अकाऊंटंट श्री बाहेती साहेब व त्यांचे सहकारी चार्टर्ड अकाऊंटंट श्री गायकवाड यांनी उपयुक्त सुचना बँकेस केल्या आहेत. त्यांचे संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो.

**● संचालक प्रशिक्षण :**

रिझर्व्ह बँकेने व सहकार खात्याने सर्व नागरी बँकांच्या पदाधिकाऱ्यांकरीता बँकींगची व कोषातील घडामोडींची माहिती होण्यासाठी व त्यानुसार बँकेचे धोरण ठरविण्यासाठी संचालकांना विविध प्रकारचे प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. त्यानुसार संचालकांना आवश्यक प्रशिक्षण कार्यक्रमाला पाठविण्यात आले.

**● अंतर्गत अंकेक्षण :**

मे. डि. एल. [illegible], चार्टर्ड अकौन्टंट यांनी अंतर्गत अंकेक्षण केलेले असून त्यांनी केलेल्या सुचनांवर त्वरीत व्यवस्थापक स्तरावर कार्यवाही करण्यात आली.

**● बँकींग व्यवहार :**

बँकेने विजयादशमीच्या शुभपर्वावर दिनांक [illegible] ऑक्टोबर २००४ ला बँकींग व्यवसाय सुरु केला. बँकींग व्यवहार हे सकाळी ११ ते सायं. ६ वाजेपर्यंत होतात. बँकेमध्ये ग्राहकांना लॉकर सुविधा अल्पदरात उपलब्ध आहे. सभासदांना कर्ज त्वरीत वितरीत केले जाते. बँकेमध्ये विविध प्रकारच्या इतर बँकेच्या तुलनेत जास्त व्याज देणाऱ्या आकर्षक व्याजाच्या ठेव योजना आहेत. भारतभर कोठेही डीमांड ड्राफ्ट आपल्या बँकेतुन काढता येतो. ग्राहकांच्या सेवे करीता विद्युत बिले भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. बँक क्लिअरींग हाऊस मेंबर असल्याने धनादेश त्वरीत वटुन त्याच्या त्याच दिवशी खात्यावर तात्काळ रक्कम मिळते.

**● कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण :**

बँक कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना दिलेली सेवा व बँकेचा वाढविलेल्या नावलौकिक या करीता कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत. सहकारी बँकांमध्ये बँकेचे हित हे स्वतःचे हित समजुन कर्मचारी निर्धारित वेळेपेक्षा जास्त [illegible] सेवा देत असतात. हे काम समाजसेवेचा भाग आहे. स्पर्धात्मक युगात ग्राहकांना अधिक संतुष्ट, उत्तम, विनम्र व तत्पर अर्थसेवा देण्याकरीता ते कटिबध्द राहतील असा विश्वास आहे.

कर्मचाऱ्यांना विविध सहकारी प्रशिक्षण संस्था, धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्था व रिझर्व्ह बँकेच्या विभागाने आयोजित प्रशिक्षण वर्गाला पाठविण्यात आले.

**● बँकेस अतिथींचे भेट आणि आभार :**

बँकेच्या ५ वा "वर्धापन दिन" मोठ्या उत्साहात विजयादशमीच्या शुभपर्वावर साजरा करण्यात आला. त्यानिमित्त आयोजीत कार्यक्रमास संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. कमलसिंग या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होत्या. तसेच अधिकार अभियंता श्री. बाळासाहेब लुंगे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते. तसेच मराठा सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष श्री. दिलीप देशमुख यांची उपस्थिती होती. जिजाऊ बँकेची दमदार प्रगती, सहकार क्षेत्रात दमदार व आधुनिक सेवेमुळे तसेच निस्पृह संचालक मंडळाच्या कार्यामुळे झाली असल्याचे अतिथींनी सांगितले. जिजाऊ स्मृती दिनानिमित्य आयोजित कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. रविंद्र ठाकरे प्रमुख अतिथी यांनी अर्थ सफल समाजनिर्मितीकरीता बँकेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. अतिथींचे मनःपुर्वक आभार !

# JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD., AMRAVATI

REGD. NO. ATI/ATI/BNK (O) 312/99

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED ON 31.03.2007 (EXPENDITURE SIDE)

FORM "B"

| Sr No. | Particulars | AMOUNT 2005-06 | AMOUNT | AMOUNT 2006-07 | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 1 | A) INTEREST PAID ON DEPOSITS | | | | |
| | 1. Double Benefit Deposit | 2018602.00 | | 2777802.00 | |
| | 2. Monthly Income Deposit | 1361440.00 | | 1561969.00 | |
| | 3. Short Term Deposit | 8680744.00 | | 11611581.00 | |
| | 4. Monthly Recurring Deposit | 74744.00 | | 108041.00 | |
| | 5. Daily Recurring Deposit | 87703.00 | | 102166.00 | |
| | 6. Saving Deposits | 1058562.00 | | 2079136.00 | |
| | 7. Jijau Saving Link Deposit. | 740035.00 | | 1030368.00 | |
| | 8. Rajshree Shahu Shikshan Yojna | 172590.00 | | 201933.00 | |
| | 9. Special Fixed Deposit | 0.00 | | 240905.00 | |
| | 10. Sant Tukaram Artha Vrudhi Yojna | 0.00 | | 12232.00 | |
| | 11. Sant Tukaram Smruti Thev Yojna | 0.00 | | 8991.00 | |
| | 12. Int. on Staff Security Deposits | 0.00 | | 13132.00 | |
| | | | 14199020.00 | | 20555676.00 |
| 2 | COMMISSION & BROKARAGE | | | | |
| | 1. Commission Paid to Banks | 11314.05 | | 30529.74 | |
| | 2. Commission Paid to Agents | 138360.00 | | 164960.00 | |
| | 3. Other Commission | 122365.00 | | 177190.00 | |
| | 4. Int. Paid on Govt. Securities | 5087.00 | | 337.36 | |
| | 5. Commission Payable to D.R.D. Agent | 0.00 | | 33458.00 | |
| | | | 277126.05 | | 406475.10 |



जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

| AMOUNT 31/03/2006 | LIABILITIES | AMOUNT 31/03/2007 |
|---|---|---|
| -- | **4] Credit Balance of Advance (S.C.C.)** | 511392.50 |
| | | 511392.50 |
| | **5] BILLS FOR COLLECTION** | |
| 726809.00 | 1) Inward Bills Payable | 833517.00 |
| 2247096.80 | 2) Outward Bills Payable | 3502017.00 |
| 2973905.80 | | 4335534.00 |
| | **6] INTEREST PAYABLE** | |
| 19926180.00 | 1) Interest Payable | 18849101.00 |
| 10598440.00 | 2) Overdue Interest Reserve | 19311017.00 |
| 30524620.00 | | 38160118.00 |
| | **7] OTHER LIABILITIES** | |
| 240796.00 | 1) Sundry Creditor A/c | 258950.00 |
| 16202.40 | 2) Misc. Deposits | 15652.40 |
| 521901.00 | 3) Unpaid Demand Draft | 529926.00 |
| 79600.00 | 4) Bonus Payable | 94505.00 |
| 29400.00 | 5) Provision For Gratuity | -- |
| 22355.00 | 6) Professional Tax | 1800.00 |
| 16205.00 | 7) Provision For Building Tax | -- |
| 380533.00 | 8) Provision For N.P.A. (Standard Assets) | 1137051.00 |
| -- | 9) T.D.S. Contractor | 3382.00 |
| 19000.00 | 10) Provision For Education Fund | 10000.00 |
| 73980.00 | 11) Share Suspense | 882025.00 |
| 250350.00 | 12) Audit Fee Payable | 270723.00 |
| 35804.00 | 13) Employees Provident Fund | 13050.00 |
| 1705998.40 | | 3225734.40 |
| | **8] INCOME** | |
| | **9] BANK GUARANTEE** | |
| 100000.00 | 1) BANK GUARANTEE | 125000.00 |
| 100000.00 | | 125000.00 |

| AMOUNT 31/03/2006 | ASSETS | AMOUNT 31/03/2007 |
|---|---|---|
| | **4] INVESTMENT** | |
| 10000.00 | 1) V.S. Co-op. Bank. Mumbai | 10000.00 |
| 1000.00 | 2) A.D.C.C. Bank. Amravati | 1000.00 |
| 11000.00 | | 11000.00 |
| | **4] INVESTMENT IN GOVT. SECURITIES** | |
| 48130000.00 | 1) Investment in Govt. Securities | 48130000.00 |
| 48130000.00 | | 48130000.00 |
| | **4-A] PERMIUM PAID ON GOVT. SECURITI** | |
| 1768548.00 | 1) Premium Paid on Govt. Securities | 1428648.00 |
| 1768548.00 | | 1428648.00 |
| | **5] INTEREST RECEIVABLE** | |
| 1293557.00 | 1) Interest Receivable | 858083.00 |
| 6936925.00 | 2) Overdue Interest Receivable | 10459149.00 |
| 8230482.00 | | 11317232.00 |
| | **6] LOANS & ADVANCES** | |
| 5264644.00 | 1) Against Short Term Deposit | 5896107.00 |
| 3464062.00 | 2) Against Double Benefit Deposit | 616344.00 |
| 1117225.00 | 3) Against Monthly Income Plan | 359422.00 |
| -- | 4) Against Special Fixed Deposit | 116569.00 |
| 78870595.35 | 5) Secured Cash Credit | 91979925.95 |
| -- | 6) Add Credit Balance (S.C.C.) | 511392.50 |
| 53124250.00 | 7) Secured Personal Loan | 37002925.50 |
| 12210740.00 | 8) Hypothecation Installment Loan | 13901434.50 |
| 27177755.00 | 9) House Mortgage | 42801965.00 |
| 662258.00 | 10) Unsecured Personal Sec. Loan | 618496.00 |
| 5500683.00 | 11) Vehicle Loan | 12281220.00 |
| | 12) Bill Discounting | 32241.00 |
| 12355.00 | 13) Advance to Staff | 45793.00 |
| 1383900.00 | 14) Against Government Securities | 6803634.00 |
| 45095.00 | 15) Against Rashtree Shahu Shi. Yojna | 33735.00 |
| 91276.00 | 16) Against Daily Recurring Deposit | 100854.00 |
| -- | 17) Agriculture Loan | 1990801.00 |
| 167604259.35 | | 216279542.49 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 100000.00 | 1) BANK GUARANTEE | 25000.00 | | 17) Agriculture Loan | 1990801.00 |
| 100000.00 | | 125000.00 | 167604259.35 | | 216279542.49 |





| AMOUNT 31/03/2006 | LIABILITIES | AMOUNT 31/03/2007 | AMOUNT 31/03/2006 | ASSETS | AMOUNT 31/03/2007 |
|---|---|---|---|---|---|
| | **10] BALANCE OF PROFIT** | | | **7] BILLS FOR COLLECTION** | |
| 2450000.00 | 1) Profit for the Year 2006-2007 | 1382276.80 | 700808.00 | 1) Inward Bills Receivable | 833517.00 |
| 2450000.00 | | 1382276.85 | 2267096.80 | 2) Outward Bills Receivable | 3502017.00 |
| | **11] BORROWINGS** | | 2973905.80 | | 4335534.00 |
| | 1) Cash Credit with A.D.C.C. Bank | 9000000.00 | | **8] OTHER DEPOSITS** | |
| | | 8000000.00 | 6000.00 | 1) With Telephone | 6000.00 |
| | | | 100000.00 | 2) With M.S.E.B | 100000.00 |
| | | | 106000.00 | | 106000.00 |
| | | | | **9] STOCK & STORES** | |
| | | | 370633.00 | 1) Dead Stock & Furniture | 170507.00 |
| | | | 96000.00 | 2) Computer & Peripherals | 113808.00 |
| | | | 8449.00 | 3) Office Equipment | 84444.00 |
| | | | 25012.00 | 4) Stationary | 72053.00 |
| | | | 501100.00 | | 441252.00 |
| | | | | **10] OTHER ASSETS** | |
| | | | -- | 1) Sundry Debtors | 25000.00 |
| | | | -- | | 25000.00 |
| | | | -- | **11] EXPENDITURE** | |
| | | | | **12] BANK GUARANTEE** | |
| | | | 100000.00 | 1) Bank Guarantee | 125000.00 |
| | | | 100000.00 | | 125000.00 |
| 327657740.93 | TOTAL LIABILITIES | 406023841.41 | 327657740.93 | TOTAL ASSETS | 406023841.41 |

S.W. Raut
MANAGER

Rajendra S. Jadhao
VICE CHAIRMAN

Avinash A. Kothale
CHAIRMAN

| Sr. No. | Particulars | AMOUNT 2005-06 | AMOUNT | AMOUNT 2006-07 | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 13 | **OFFICE EXP** | | | | |
| | 1 Office Expenses | 53861.00 | | 66867.00 | |
| | 2 Function / Anniversary Exp. | 17859.00 | | 29474.00 | |
| | 3 Donation | 11370.00 | | 8750.00 | |
| | | | 83090.00 | | 105091.00 |
| 14 | **MISCELLENCES EXPENSES** | | | | |
| | 1 Miscellences Expenses | 2826.00 | | 0.00 | |
| | | | 2826.00 | | 0.00 |
| 15 | **OTHER EXPENSES** | | | | |
| | 1 Computer Peripherals | 19990.00 | | 35957.00 | |
| | 2 Expenses for AMC (Computer) | 85796.00 | | 4000.00 | |
| | 3 Expenses for AMC (Note Counting Machine) | 4684.00 | | 4684.00 | |
| | 4 Expenses for AMC (EPABX) | 1500.00 | | 1500.00 | |
| | 5 Recovery Expenses | 0.00 | | 16932.00 | |
| | 6 Other Expenses | 0.00 | | 2615.00 | |
| | 7 Travelling Expenses | 3320.00 | | 0.00 | |
| | | | 115290.00 | | 66688.00 |
| 16 | **GOVERNMENT TAXES/FEES** | | | | |
| | 1 T.D.S Charges Paid | 0.00 | | 16078.00 | |
| | 2 Income Tax | 0.00 | | 50000.00 | |
| | | | 0.00 | | 66078.00 |
| 17 | **FEES PAID TO ASSOCIATIONS** | | | | |
| | 1 Fees Paid for Membership To Association | 32000.00 | | 19000.00 | |
| | | | 32000.00 | | 19000.00 |
| 18 | **ADVERTISEMENT EXPENSES & PUBLICATION** | | | | |
| | 1 Advertisement Expenses & Publication | 60405.00 | | 41594.00 | |
| | | | 60405.00 | | 41594.00 |

| Sr. No. | Particulars | AMOUNT 2005-06 | AMOUNT | AMOUNT 2006-07 | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 24. | **PROVISION AGAINST EXPENSES** | | | | |
| | 1. Prov. for Education Fund. | 10000.00 | | 10000.00 | |
| | 2. Prov. for Bonus | 75000.00 | | 80000.00 | |
| | 3. Provision for intt. on NPA Account | 3101902.00 | | 2942276.00 | |
| | 4. Provision For N.P.A. | 3776948.00 | | 528118.00 | |
| | 5. Provision for Guatuity | 80108.00 | | 4045.00 | |
| | 6. Provision for Invesiment Fluctuation Fund | 159258.02 | | 59815.00 | |
| | 7. Prov. For Amortised (Investment) | 484214.00 | | 442000.00 | |
| | 8. Prov. For Share Holder Welfare Fund | 300000.00 | | 2000.00 | |
| | 9. Audit Fees Payable | 123000.00 | | 0.00 | |
| | 10. Provision for Staff Welfare Fund | 100000.00 | | 0.00 | |
| 25. | **EXPENSES ON ELECTION** | | 8210430.02 | | 4068254.00 |
| | 1. Expenses On Election | 35307.00 | | 0.00 | |
| 26. | **TRAINING EXPS.** | | 35307.00 | | 0.00 |
| | 1. Employee Training Expenses | 15356.00 | | 28482.00 | |
| | 2. Director Training Expenses | 24860.00 | | 80042.00 | |
| | | | 40216.00 | | 108524.00 |
| 27. | **NET PROFIT** | | 2450000.00 | | 1382276.80 |
| | **GRAND TOTAL** | 27577277.57 | 27577277.57 | 29369703.40 | 29369703.40 |

S.W. Raut
MANAGER

Rajendra S. Jadhao
VICE CHAIRMAN

Avinash A. Kothale
CHAIRMAN

# JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD., AMRAVATI

REGD. NO. ATI/ATI/BNK (O) 312/99

## PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED ON 31.03.2007 (INCOME SIDE)

FORM "B"

| Sr. No. | Particulars | AMOUNT 2005-06 | AMOUNT | AMOUNT 2006-07 | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 1. | A) INTEREST RECEIVED ON LOANS & ADVANCES<br>INTEREST RECEIVED ON DEMAND LOANS | | | | |
| | 1. Against Double Benefit Deposit | 218303.00 | | 202546.00 | |
| | 2. Against Short Term Deposit | 595431.00 | | 342043.00 | |
| | 3. Secured Cash Credit | 11314221.20 | | 9123620.00 | |
| | 4. Hypothication Installment Loan | 966017.00 | | 1012889.00 | |
| | 5. Intt. received on House Mortgage | 2718050.00 | | 2022382.00 | |
| | 6. Intt. received on Vehicle Loan | 846567.00 | | 694641.00 | |
| | 7. Against Govt. Security | 127553.00 | | 263443.00 | |
| | 8. Unsecured Personal Loan | 86093.00 | | 41039.00 | |
| | 9. Secured Personal Loan | 3831363.00 | | 2467035.00 | |
| | 10. Against Rajshree Shahu Shik. Youjna | 5277.00 | | 5892.00 | |
| | 11. Against Monthly Income Plan. | 45125.00 | | 41624.00 | |
| | 12. Against Recurring Deposit. | 9884.00 | | 2331.00 | |
| | 13. Int. Received on Daily R. Deposit. | 920.00 | | 1976.00 | |
| | 14. Against Rajshree Shahu Bima Youjna | 0.00 | | 27112.00 | |
| | 15. Int. Received on Against Special Fixed Deposit | 0.00 | | 4257.00 | |
| | 16. Interest Received on Agricultural Loan | 0.00 | | 4101.00 | |
| | 17. Interest On Other Loans | 70970.33 | | 0.00 | |
| | | | 20535784.53 | | 17457860.00 |
| 2. | B) INTT. RECEIVED ON INVESTMENT | | | | |
| | 1. FDR with M.S.C. Bank | 278260.00 | | 1607684.00 | |
| | 2. Intt. Received on F.R. Receipts with Other Bank | 77576.00 | | 61247.00 | |
| | 3. F.D.R. with UCO Bank | 53923.00 | | 609627.00 | |
| | 4. F.D.R. With A.D.C.C.Bank | 1273158.00 | | 2381889.00 | |
| | 5. Intt. Received on Govt. Securities | 3013122.00 | | 3013122.00 | |
| | 6. Intt. Received on F.D.R Bank of Baroda | 0.00 | | 213136.00 | |



जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.